# जिल्हा परिषद -अहमदनगर

## जिल्हा परिषद-अहमदनगर अंतर्गत खालील विविध पदाचे निवडीसाठी पात्र उमेदवाराकडुन अर्ज मागणी करण्यात येत आहे.

अहमदनगर जिल्हा परिषदेच्या अस्थापनेवरील व त्यांच्या अधिपत्याखालील विविध विभागात खालील नमुद संवर्गाच्या रिक्त पदाच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवाराकडुन (लेखी/मौखिक) कनिष्ठ लेखाधिकारी गट-क या पदाच्या परिक्षेसाठी अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी अहमदनगर व परिचर गट-ड या पदाच्या परिक्षेसाठी अध्यक्ष निवड समिती (गट ड)तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या मार्फत विहित नमुन्यात ७/७/२००९ या दिनांकापर्यत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळुन) अर्ज मागविण्यात येत आहेत. ज्या उमेदवारांनी जिल्हा सेवा योजन अधिकारी, सेवा योजन कार्यालय-अहमदनगर, प्रकल्प अधिकारी-एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प-राजुर,ता.अकोले-जि.अहमदनगर,जिल्हा सैनिक कार्यालय अहमदनगर, इ. कार्यालयात नाव नोंदणी केली असेल त्यांनी देखील ते इच्छुक पात्र असल्यास विहित शुल्क भरुन या पदासाठी अर्ज करणे आवश्यक राहील.

सदर जाहिरात खालील शासन निर्णयाला अधिन राहुन देण्यात येत आहे.

**१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.एपिटी-२००९/प्रक्र-१७०/अस्थापना-८ दि. २.जून .०९**

### १) परिचर-गट-ड वेतन बँड रु.४४४०-७४४० ग्रेड पे रु.१३००/-

| प्रवर्ग | एकूण रिक्त पदे | समांतर आरक्षणाची पदे | | | समांतर आरक्षण विरहीत पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | महिला | खेळाडू | |
| अनु.जाती | १ | ० | १ | ० | ० |
| विजा-अ | ३ | ० | १ | ० | २ |
| भज-क | १ | ० | ० | ० | १ |
| भज-ड | २ | ० | ० | ० | २ |
| विमाप्र | १ | ० | ० | ० | १ |
| इमाव | ३ | १ | ० | ० | २ |
| खुला | ३१ | ७ | १४ | २ | ८ |
| एकूण | ४२ | ८ | १६ | २ | १६ |

उपरोक्त परिचर गट-ड या संवर्गातील एकूण रिक्त पदांमध्ये अपंगाच्या १ पदाचा समावेश आहे.

### २) कनिष्ठ लेखाधिकारी गट-क वेतन बँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४२००/-

| प्रवर्ग | एकूण रिक्त पदे | समांतर आरक्षणाची पदे | | | समांतर आरक्षण विरहीत पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | महिला | खेळाडू | |
| खुला | २ | ० | १ | ० | १ |
| एकूण | २ | ० | १ | ० | १ |

१. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा.(डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक)

२. समांतर आरक्षणामध्ये पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या त्या प्रवर्गातून भरण्यात येतील.

**शैक्षणिक अर्हताः-**

१) परिचर गट-ड पदासाठी कोणत्याही मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेची कमित कमी इयत्ता ४ थी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२) कनिष्ठ लेखाधिकारी गट-क पदासाठी खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे राहील.

१. मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी व कोणतेही सरकारी कार्यालय, व्यापारी भागीदारी संस्था अथवा स्थानिक प्राधिकरण यातील किमान ५ वर्षाचा अखंड सेवेचा अनुभव

२. लेखाशास्त्र आणि लेखापरिक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणा-या अथवा प्रथम व द्वितीय वर्गातील पदवीधारक अधिक पसंती.

३. गणित अथवा सांखिकी अथवा लेखाशास्त्र व लेखापरिक्षा हे प्रमुख विषय घेऊन पदव्युत्तर पदवी धारण करीत असतील अथवा सरकारी कार्यालयातील अथवा व्यापारी संस्थांतील अथवा स्थानिक प्राधिकरणातील लेखा कार्याचा अनुभव असणा-यांना अधिक पसंती दिली जाईल.

४. नामनिर्देशनाद्वारे नेमणुक दिलेल्या व्यक्तींना उपलेखापालांची परिक्षा त्या पदावरील त्यांच्या नेमणुकीपासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण व्हावे लागेल. तो उत्तीर्ण न झाल्यास तो सेवामुक्त करण्यास पात्र होईल.
परंतु अपवादात्मक बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी कारणे लेखी नमुद करुन उत्तीर्ण होण्याचे कालावधीत एक वर्षाने वाढ करु शकेल.

विशेष सुचनाः-शासन निर्णय दिनांक १९ मार्च २००३ व अनुषंगीक सुधारीत शासन निर्णयान्वये कनिष्ठ लेखाधिकारी गट-क पदांकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी/वापराबाबतचे खाली नमद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

३) उमेदवाराचे वय दिनांक ०७/०७/०९ रोजी खुल्या प्रवर्गासाठी १८ पेक्षा कमी व ३३ पेक्षा जास्त नसावे व इतर मागासवर्गीय व मागासवर्गीयांसाठी ३८ पेक्षा जास्त नसावे.

४) माजी सैनिकांसाठी ४५ वर्ष ही कमाल वयोमर्यादा

५) शासनाच्या दि.२६ ऑगस्ट २००५ च्या शासन निर्णयानुसार सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत ३ वर्ष अंशकालीन काम केलेल्या उमेदवारांना उच्चतम वयोमर्यादा ४५ राहील.

६) अपंग उमेदवारासाठी उच्च वयोमर्यादेची अट ४५ वर्ष राहिल.

७) स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य यांच्यासाठी उच्च वयोमर्यादा ५ वर्ष शिथिल राहील.

८) लष्करी कारवाईत मृत्यु पावलेल्या अथवा विकलांग सैनिकाच्या कुटुंबापैकी एकाच व्यक्तीच्या बाबतीत वयोमर्यादा ४५ वर्षे राहिल.

<u>अर्ज कसा करावा.</u>

१) उमेंदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक.)

२) उमेदवारांनी सोबत दिलेल्या नमुन्यातच अर्ज करावा व त्यावर अलिकडील काळात काढलेला राजपत्रित अधिका-यांनी किंवा त्या दर्जाच्या अधिका-यांनी स्वाक्षाकित केलेला पासपोर्ट साईज फोटो लावावा.

३) उमेदवारांनी अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या सुस्पष्ट दिसतील अशा राजपत्रित अधिका-याने प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. तसे नसल्यास अर्ज अपुर्ण समजुन नाकारला जाईल. छायांकित प्रती शक्यतो खालील क्रमानुसार जोडणे आवश्यक आहे.

१. पदासाठी आवश्यक असणा-या शैक्षणिक अर्हतेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र.

२. शाळा सोडल्याचा दाखला.
३. जन्मतारीख शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रावरुनच ग्राहय धरण्यात येईल.
४ .उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. अनु.जमातीच्या उमेदवाराची अंतिम निवड झाल्यानंतर जात पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यास नियुक्ती दिली जाणार नाही.
५. माजी सैनिक प्रमाणपत्रे सक्षम अधिका-यांचीच ग्राहय धरण्यात येईल.

४) सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्रं.पअक-१००५/प्र.क्र.३६/०५/१६-अ दि.२६.८.२००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे सोबतच्या नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

५) सेवायोजन कार्यालय/आदिवासी विकास प्रकल्प,राजूर, जिल्हा सैनिक कार्यालय यांच्याकडेस नोंदणी केलेल्या उमेदवारास जाहिराती नुसार अर्ज करणे बंधनकारक राहील.

६) अर्जासोबत उपरोक्त पदाकरिता खुल्या प्रवर्गासाठी रु.२००/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु.१००/- मात्रचा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचे नावे काढलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्ट (डी.डी.) द्वारे सेवा शुल्क म्हणुन जोडावे. (माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट नाही.) सदर शुल्क हे नापरतावा राहील कोणत्त्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

७) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नांव नोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्रांची साक्षांकित केलेली छायांकित प्रत उपलब्ध असल्यास अर्जासोबत जोडावी.

८) अनुभवाच्या बाबतीत तासिक तत्वावर शिकाऊ उमेदवार अर्धवेळ,विनावेतन,अतिरिक्त कार्यभार प्रभारी पदावरील अनुभव ग्राहय धरला जाणार नाही.

९) शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे .

१०) महाराष्ट् राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती),भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि.२९ जानेवारी २००४ पासुन अमलात आणला आहे. या अधिनियमातील नियम क्रं.४ (२) (दोन) खालील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता सर्व आरक्षणाच्या प्रवर्गांना लागू असेल अशी तरतुद केलेली आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याने (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र दिनांक ३१ मार्च २००९ अखेरचे सादर करणे आवश्यक आहे.

११) महिलांसाठी असलेले आरक्षण हे संबंधित सामाजिक प्रवर्गासाठी समांतर राहिल. तथापि संबंधित प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षित असलेले पद इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र ठरणा-या पुरुष उमेदवारामधुन भरण्यात येईल. खुल्या गटातील महिलांचे ३० टक्के समांतर आरक्षण (नॉन क्रिमीलेअर),उन्नत व प्रगत गटात न मोडणा-या महिलांसाठी राहील. नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्राची पडताळणी मा.आयुक्त, महिला व बालकल्याण पुणे यांचेकडुन करुन घेतल्यानंतरच नियुक्ती आदेश दिले जाईल. तसेच भज (क), (ड) व इमाव प्रवर्गातील सर्व उमेदवारांना (पुरुष/स्त्री) सदर आरक्षणाचा लाभ नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या आधारे मिळेल. मागास प्रवर्गातील महिला उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल तर त्यानी त्या संबंधी जातीच्या वैधता प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे. जर अशा महिला त्यांच्या संबंधी जातीच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करु इच्छित नसतील किंवा सादर करु शकत नसतील तर अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलाप्रमाणेच नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. व अशा प्रमाणपत्राची पडताळणी मा.आयुक्त,महिला व बालकल्याण-पुणे यांच्याकडुन करुन घेतल्यानंतरच नियुक्ती आदेश दिला जाईल.

१२) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण शा.नि.शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,क्रं.रक्रिधो-२००२/प्रक्र६८/क्रियुसे-२ दिनांक ३० एप्रिल २००५ मधील तरतुदीनुसार राहील. खेळाडुंसाठी राखीव असलेल्या पदांवर निवडीसाठी अर्हता पुढीलप्रमाणे असेल. सदर पदासाठी त्या त्या खेळाच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम,व्दितीय,तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण रौप्य किंवा कास्यपदक प्राप्त करणारा खेळाडू राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात. तसेच राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (**NCC**) अंडर ऑफिसरची रँक मिळवुन राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती,अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. खुल्या प्रवर्गामधील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. तसेच खेळाडुंच्या आरक्षित पदावर नेमणुकीकरिता ज्या खेळाडुंची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे व त्यांनी आरक्षित पदाकरिता केलेला अर्ज संचालक,क्रिडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडुन पडताळणी झालेनंतरच नियुक्ती आदेश दिले जातील.

१३) अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाची सेवा योजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. तसे केल्याचे पुरावे अर्जासोबत जोडावे.

१४) एखादया अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

१५) उपरोक्त शैक्षणिक अर्हता व अनुभव किमान अर्हता व अनुभव दर्शवित आहे.

१६) रिक्त पदाच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची तसेच आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परीक्षेचा प्रकार,पदांची संख्या,समांतर आरक्षण याबाबत बदल करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,अहमदनगर हे स्वतः राखुन ठेवत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१७) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याची किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अथवा उमेदवार अपात्र आढळुन आल्यास उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष निवड समिती यांना राहिल.

१८) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१९) परिचर गट-ड या पदासाठी विहीत मुदतीत प्राप्त न झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही .तसचे पोष्टाच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही. याशिवाय उमेदवार स्वतः पूर्ण भरलेला अर्ज परिचर गट-ड या पदासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद अहमदनगर यांचे कार्यालयात तसेच दिनांक ०७/०७/२००९ या मुदतीत (सुट्टीचे दिवस वगळुन) सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत दाखल करु शकतील.जाहीरातीच्या दिनांकापुर्वी या कार्यालयाकडे पाठविलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२०) कनिष्ठ लेखाधिकारी गट-क विहीत मुदतीत प्राप्त न झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही .तसचे पोष्टाच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही. याशिवाय उमेदवार स्वत. पूर्ण भरलेला अर्ज कनिष्ठ लेखाधिकारी गट-क या पदासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचे कार्यालयात तसेच दिनांक ०७ /०७/२००९ या मुदतीत (सुट्टीचे दिवस वगळुन) सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत दाखल करु शकतील.जाहीरातीच्या दिनांकापुर्वी या कार्यालयाकडे पाठविलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२१) सदर अर्ज स्वीकारण्याचा दिनांक, परिक्षेचा वार, दिनांक व वेळ खालीलप्रमाणे आहे. पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परिक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदांसाठी घेण्यात येणा-या परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक,परिक्षा केंन्द्र, बैठक क्रमांक प्रवेशपत्रावर नमुद करणेत येईल.

| अ. क्र. | पदाचे नाव | अर्ज स्विकारण्याचे ठिकाण व अर्ज कोणाच्या नांवे करावयाचा त्यांचा हुद्दा | परिक्षेचा वार व दिनांक | परिक्षेची वेळ | लेखी – तोंडी परिक्षेचे गुण गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | परिचर गट-ड | सदस्य सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी सा) जि.प.अहमदनगर | शनिवार दिनांक २५ जुलै २००९ | दुपारी २.०० ते ३.३० | ७५ २५ |
| २ | कनिष्ठ लेखाधिकारी | सदस्य सचिव तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.अहमदनगर | शनिवार दिनांक २५ जुलै २००९ | दुपारी २.०० ते ३.३० | १८० २० |

**पोस्टाने अगर समक्ष दि.०७/०७/२००९ अखेर सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्ज स्विकारले जातील, त्यानंतर कोणताही अर्ज स्विकारला जाणार नाही.**

## निवड कार्यपध्दत

**१) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या निवड समिती मार्फत गट ड ची पदे विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार निवड प्रक्रिया पार पाडण्यात येईल.**

**२) अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या निवड समिती मार्फत गट क (कनिष्ठ लेखाधिकारी) ची पदे विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार निवड प्रक्रिया पार पाडण्यात येईल.**

टिप - लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र पोस्टाने पाठविले जाईल.पोस्टाच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही.ज्या उमेदवारांना प्रवेशपत्र प्राप्त होणार नाही त्यांना प्रवेश पत्र जिल्हा परिषद अहमदनगर येथील कार्यालयात दिनांक २३/७/२००९ रोजी उमेदवारांना ओळख पटवून देण्यात येईल. लेखी परिक्षेच्या तारखेमध्ये काही बदल झाल्यास त्याबाबतची कल्पना ज्या वर्तमानपत्रात ही जाहिरात आलेली आहे त्याच वर्तमानपत्रात देणेत येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-
सचिव,गट-ड निवड समिती
तथा उप मुख्य कार्यकारी
अधिकारी (सा)
जिल्हा परिषद,अहमदनगर

स्वाक्षरी/-
सचिव,जिल्हा निवड समिती
तथा मुख्य लेखा व वित्त
अधिकारी
जिल्हा परिषद,अहमदनगर

स्वाक्षरी / -
जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

स्वाक्षरी /-
अध्यक्ष,जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी, अहमदनगर

# अर्जाचा नमुना

जिल्हा परिषद अहमदनगर

| अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक |
|---|
| |

| प्रवर्ग | क्रमांक |
|---|---|
| | |

या ठिकाणी स्वत:चा पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व त्यावर राजपत्रित अधिका-याची स्वाक्षरी असावी.

प्रति,
सदस्य सचिव,
जिल्हा निवड समिती
तथा-----------------
जिल्हा परिषद अहमदनगर

विषय – ------------------------------ या पदासाठी अर्ज - सन २००९

१) संपुर्ण नाव (मराठीत)

| स्वत:चे नाव | वडिलांचे / पतिचे नाव | आडनाव |
|---|---|---|
| | | |

संपुर्ण नांव इंग्रजीत (Capital letter)

| First Name | Father/Husband Name | Surname |
|---|---|---|
| | | |

२) पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
पोस्ट - - - - - - - - - - - - - - - - - - तालुका - - - - - - - - - - - -
जिल्हा - - - - - - - - - - - - - - - - - पिनकोड - - - - - - - - - - - - -

३) अर्जदार कोंणत्या प्रवर्गाचा आहे.(खालीलपैकी लागु असलेल्या प्रवर्गाचा क्रमांक चौकोणात लिहावा.)

| अनु जाती | अनु.जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सर्वसाधारण (अराखीव) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

अ) जातीचा उल्लेख करावा -------------
ब) नॉन क्रिमिलिअरचा दाखला जोडला होय / नाही
४) अर्जदार स्त्री आहे की पुरुष स्त्री / पुरुष
५) अर्जदाराचा प्रकार -
१) लष्करातील माजी सैनिक होय / नाही
२) स्वातंत्र्यसैनिक यांचा पाल्य (अर्जदार नामनिर्देशित केलेला असावा.) होय / नाही
३) खेळाडु (शासन निर्णय दि.३०/४/२००५ नुसार पात्र असल्यास) होय / नाही
४) अंशकालीन कर्मचारी आहे किंवा कसे . होय / नाही
खेळाडु असलेबाबतचे प्रमाणपत्र ज्या अधिका-याने दिले आहे, त्याचा हुद्दा, स्थळ, जा.क्र. व दिनांक नमुद करावा.

५) अपंग (शासन निर्णय दि.६/५/२००४ नुसार पात्र असल्यास) होय / नाही
असल्यास अपंगत्व प्रकाराचा उल्लेख करावा.
६) अर्जदाराची जन्मतारीख (अंकामध्ये) (शालांत परिक्षा प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला) -

| तारीख | महीना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

दि. .   /०६/२००९ रोजीचे पुर्ण वय -

| दिवस | महीने | वर्ष |
|---|---|---|
| | | |

७) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता

| अ. नं. | अर्हता | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

८) राष्ट्रीयत्व भारतीय / अभारतीय
९) महाराष्ट्राचा मुळचा रहीवाशी आहे काय? होय / नाही
१०) अर्जदार विवाहीत आहे की अविवाहीत ? विवाहीत / अविवाहीत
११) अर्जदाराने नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयाकडे नाव नोंदणी केली आहे काय? होय / नाही
असल्यास नोंदणी कार्यालयाचे नाव - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
नोंदणी क्रमांक - - - - - - - - - - - - - - - दिनांक - - - -- - - - - - - - - - - - - -
१२) डी.डी.(मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अहमदनगर यांच्या नावाने) जोडलेले आहे काय? - होय / नाही

| डिमांड ड्राप्ट क्रमांक | डिमांड ड्राप्ट दिनांक | डिमांड ड्राप्ट रक्कम | बॅकेचे नाव | बॅकेची शाखा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहीतीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता माझ्यापाशी आहे याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो/ करते की वर दिलेली माहीती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास नोकरी गमावण्यास व त्या अनुषंगाने होणा-या इतर कारवाईस मी पात्र व बांधील राहीन व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण - अर्जदाराची सही -
दिनांक - / /२००९ (नाव) -

--o——

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना
प्रतिज्ञापत्र
नमुना - अ
(नियम ४ पहा)

मी श्री./ श्रीमती - - - - - - - - - - - - - - - - श्री. - - - - - - - - - - - - - - - -यांचा/ यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय - - - - वर्षे राहणार- - - - - - - - - - - - - - याद्वारे पुढीलप्रमाणे जाहीर करतो की / करते की,

१. मी - - - - - - - - - - - - - - - - - - - या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.
२. आज रोजी मला - - - - (संख्या) इतकी लहान मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -- - - - आहे.(असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)
३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणिव आहे.

ठिकाण - अर्जदाराची सही -

दिनांक - नाव -

सदरची जाहिरात अहमदनगर जिल्हा परिषदेच्या http://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.